# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे — ४११ ००७.

दूरध्वनी क्र. ०२०—२५६०११४३, २५६०११४२, टेलिफॅक्स २५६९७५११

संदर्भ: विक्रीमं/शिबीर/७०१ दिनांक: १९ जून, २०१८.

प्रति,
मा. प्राचार्य,
संबंधित संलग्न महाविद्यालये,

**विषय: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न वरिष्ठ महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकांचे चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर २०१८—१९ बाबत.**

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरून आपणांस या पत्राद्वारे कळविण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०१८—१९ मधील ३३ वे शारीरिक शिक्षण संचालकांचे चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर क्रीडा मंडळाच्या विद्यमाने व **संगमनेर नगरपालिका कला, डी जे मालपाणी वाणिज्य व बी एन सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर, जि. अहमदनगर** या महाविद्यालयाच्या सौजन्याने **बुधवार, दि. १८ जुलै, २०१८ ते शुक्रवार, दि. २० जुलै, २०१८** या **कालावधीत मालपाणी रिसोर्ट** येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या चर्चासत्रास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न वरिष्ठ महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थामध्ये **पूर्ण वेळ कार्यरत असलेल्या शारीरिक शिक्षण संचालकांना उपस्थित राहणे क्रमप्राप्त राहील.** तसेच ज्या महाविद्यालयात व मान्याप्राप्त संस्थामध्ये महिला शारीरिक शिक्षण संचालक पूर्ण वेळ कार्यरत असतील संबंधितांनादेखील उपस्थित राहणे अनिवार्य राहिल.

या क्रीडा चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराच्या आपल्या महाविद्यालयात पूर्ण वेळ कार्यरत असलेल्या शारीरिक शिक्षण संचालकांना खालील सूचना निर्देशित कराव्यात, ही विनंती.

**अ)** शारीरिक शिक्षण संचालक चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित राहण्याबद्दल संबंधित शारीरिक शिक्षण संचालकांचा दैनंदिन भत्ता, प्रवास खर्च व इतर अनुषांगिक खर्च हा नियमानुसार संबंधित महाविद्यालयास करावा लागेल. याबाबतची पूर्वपरवानगी मा.सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे — १ यांचेकडून मिळालेली आहे. त्यासंबंधिची कागदोपत्री करण्यात येणारी पुर्तता शिबीरादरम्यान सर्व सहभागी शारीरिक शिक्षण संचालकांना देण्यात येईल.

**ब)** चर्चासत्र व क्रीडा शिबीर मार्गदर्शनाचा कालावधी एकुण तीन दिवसांचा असेल. प्रत्येक शिबीरार्थीस

नोंदणी शुल्क रू. ५००/—(पाचशे रूपये फक्त) प्रतिदिनी याप्रमाणे रू. १,५००/— (एक हजार पाचशे रूपये फक्त) व अनामत रक्कम म्हणून रू. १०००/— (एक हजार रूपये फक्त) एवढी रक्कम सहभागी होणाऱ्या शारीरिक शिक्षण संचालकांना बुधवार, दि. १८ जुलै, २०१८ रोजी नावनोंदणी करतेवेळी चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर आयोजन करणाऱ्या महाविद्यालयाकडे रोख स्वरूपात जमा करणे क्रमप्राप्त राहील. सदर दोन्ही रक्कमेची रितसर पावती सहभागी शारीरिक शिक्षण संचालकांना देण्यात येईल. दि. २० जुलै, २०१८ रोजी रू. १०००/— (एक हजार रूपये फक्त) अनामत रक्कमेची पावती सादर केल्यानंतर रू. १०००/— (एक हजार रूपये फक्त) शा. शिक्षण संचालकास देण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

क) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित राहणाऱ्या शारीरिक शिक्षण संचालकांची निवास, नास्ता, चहापान, भोजन व आवश्यक स्टेशनरी संयोजन महाविद्यालयाकडून देण्यात येईल.

ड) बुधवार, दि. १८ जुलै, २०१८ रोजी चर्चासत्राच्या ठिकाणी ठीक दुपारी १२.०० वाजेपर्यंत सर्व शारीरिक शिक्षण संचालकांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रत्येक सहभागी शिबीरार्थीजवळ नाव नोंदणी करताना संबंधिताने आपण ज्या महाविद्यालयात शारीरिक शिक्षण संचालक म्हणून कार्यरत आहात व शिबीरास उपस्थित राहण्याबाबतचे **मा. प्राचार्यांचे संमतीपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.** बुधवार, दि. १८ जुलै, २०१८ रोजी दुपारी ठिक १.०० वा शिबीरार्थींना चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराबाबत विशेष सूचना देण्यात येतील.

**टीप : सर्व शारीरिक शिक्षण संचालक (पुरूष/महिला) यांनी संगमनेर येथे उपस्थित राहावे.**

इ) **या चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराच्या कालावधीत कोणत्याही शारीरिक शिक्षण संचालकास खाजगी कामाकरीता अन्य ठिकाणी जाण्याची कोणत्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी**. बुधवार, दि. १८ जुलै, २०१८ ते शुक्रवार, दि. २० जुलै, २०१८ या कालावधीत होणाऱ्या शिबीराच्या प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य असेल तद्नंतरच संबंधित शिबीरार्थीस शिबीरास उपस्थितीबाबतचे **प्रमाणपत्र व कार्यमुक्ती आदेश (Reliving Order)** देण्यात येईल.

ई) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर उद्घाटन व समारोपदिनी प्रत्येक शारीरिक शिक्षण संचालकांकडे पूर्ण पांढरा गणवेश (पोशाख) असणे आवश्यक आहे. नसल्यास किमान पांढरा शर्ट/टी—शर्ट आवश्यक राहील. महिला शारीरिक शिक्षण संचालकांना पांढरा पंजाबी ड्रेस आवश्यक राहील.

३) या चर्चासत्रास व क्रीडा मार्गदर्शन शिबीराकरिता डॉ. मन्मथ घरोटे, डॉ. सोनाली तळवलीकर, प्रा. गौतम जाधव, डॉ. किशोर पठारे, डॉ. सॅव्हिओ वेगस्, प्रा. विक्रम फाले, डॉ. शोभा शिंदे, प्रा. विद्या पठारे, प्रा. अनिरूध्द शर्मा, प्रा. सचिन शिंदे, प्रा. अक्षय काशिद व श्री. मकरंद टिल्लू मार्गदर्शन करणार असून ध्यानधारणा, प्राणयाम, योगासने, हास्ययोग, ॲरोबिक्स या विषयांवर व्याख्याने व प्रात्यक्षिक देणार आहेत.

महत्त्वाच्या सूचना :

१. शिबीरार्थींनी शिबीरास येताना **मौल्यवान वस्तु** अथवा **रोख रक्कम** ही स्वत:च्या जवाबदारीवर आणावी.
२. निवासाची व्यवस्था क्रीडा संचालकांना प्रत्येक रूममध्ये पाच व्यक्ती अशाप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येईल.
३. बुधवार, दि. १८ जुलै, २०१८ रोजी सकाळी ठीक ११.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत मालपाणी रिसॉर्ट, संगमनेर येथे स्वागत व नोंदणीकक्ष येथे उपस्थित राहावे.
४. ओळखपत्राकरीता प्रत्येक सहभागी शारिरीक शिक्षण संचालकांने **एक रिव्हेन्यू स्टॅम्प साईज फोटो (Revenue Stamp Size Photo)** सोबत आणावा.

कृपया सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकांच्या निदर्शनास आणुन या शिबीरातील क्रीडा क्षेत्रातील आधुनिक बाबी आत्मसात करण्यासाठी अवश्य उपस्थित राहण्यास सांगावे.

धन्यवाद! सहकार्याची अपेक्षा!

कळावे,

आपला,

**संचालक,**
**क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ**

प्रत माहितीसाठी:—

१) मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सहायक
२) मा. प्र—कुलगुरू यांचे कार्यकारी सहायक
३) मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
४) मा. सदस्य, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ
५) मा. वित्त व लेखाधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
६) मा. जनसंपर्क अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
७) मा. प्राचार्य, संगमनेर नगरपालिका महाविद्यालय, संगमनेर
८) मा. शा. शि. संचालक, संगमनेर नगरपालिका महाविद्यालय, संगमनेर